# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १८३/२००८/ दिनांक :

१) श्री. विश्वनाथ यशवंत कानिटकर,
विजयनगर, कुपवाड, जि.सांगली अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली.

विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता (शहर),महावितरण,
शहर विभाग, हिराबाग वॉटर वर्क्सजवळ, सांगली.

३) उपकार्यकारी अभियंता,महावितरण,उ. वि. माधवनगर,सांगली.
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम** :– १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

श्री. जावेद मोमीन, अर्जदार प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ६.५ चे तरतुदीनुसार

## न्यायनिर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे                    दिनांक ११.११.२००८

प्रस्तुत अर्ज हा अ नमुन्यामध्ये अर्जदार यांना वि.प.तर्फे त्यांचेकडील थकबाकी वसुलीकामी १५ दिवसांची नोटीस आली असलेने व न भरल्यास वीज पुरवठा खंडित करणे बाबत कळविले असलेने या मंचाकडे देण्यात आलेला आहे. सदर अर्ज दि. ३.७.२००८ रोजी प्राप्त झाला आहे. अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली यांचेकडे दिनांक १३.५.२००८ रोजी अर्ज दिला. मात्र त्या अर्जाच्या निकाला अक्षोदरच अर्जदारास वीज पुरवठा खंडित होण्याची भिती निर्माण झाल्याने सदरचा अर्ज या मंचाकडे केलेला आहे. अर्जदाराचे म्हणणे की, ते यंत्रमागधारक असून वि.प.चे ग्राहक आहेत. त्यांचा ग्राहक क्र. २७९९५००८५८९९ असा आहे. महाराष्ट्र सरकारने यंत्रमागधारकांना यंत्रमाग संजीवनी योजना लागू केली होती व त्याप्रमाणे दि. ३१.३.२००४ अखेर असणाऱ्या वीज बिलाच्या थकबाकीमध्ये ५०% सवलत देण्यात आली होती. असे असतांनाही वि.प.ने यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ दिला नाही व वेळोवेळी चुकीची बिले देण्यात आली. अशा बिलापोटी अर्जदाराने कांही रकमा भरलेल्या आहेत. परंतु अखेर वीज पुरवठा खंडित करणेची नोटीस दिल्याने अर्जदाराने न्याय मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला. त्यांचे म्हणणे की, यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देवून योग्य ती बिले देण्याबाबत वि.प.स आदेश व्हावा.

या प्रकरणामध्ये या मंचाचे सदस्यद्वय यांनी या प्रकरणाचा निकाल होईल पर्यंत अर्जदाराचा वीज पुरवठा खंडित करु नये असा दिनांक ११.८.२००८ रोजी आदेश दिला.

या तक्रार अर्जाबाबत म्हणणे दाखल करण्याची वि.प.ला नोटीस दिली व म्हणणे दाखल करण्यास संधी दिली. त्याप्रमाणे वि.प.कडून लेखी म्हणणे देण्यात आले. तसेच त्यासोबत सीपीएलचे उतारे व ऑडीटेड स्टेटमेंट दाखल करण्यात आले. ऑडीटेड स्टेटमेंट व सीपीएलच्या उताऱ्यामध्ये अर्जदाराने भरलेल्या रकमांचा उल्लेख आहे. सीपीएलच्या उताऱ्यामध्ये अर्जदारास आकारण्यात आलेल्या वीज बिलाबाबतच्या रकमा एमईआरसीच्या दराप्रमाणे नांवे दिलेल्या आहेत. परंतु महाराष्ट्र सरकारने २००१, २००३ व २००४ या काळामध्ये यंत्रमागधारकांना वीज दरामध्ये ज्या सवलती दिल्या त्याचा उल्लेख सीपीएलमध्ये आला नसलेने वि.प.ने त्या बाबत ऑडीटेड स्टेटमेंट दाखल केलेले आहे व सवलतीच्या दराने वीज आकारणी करुन आकारलेल्या रक्कम नांवे दिलेली आहे. तसेच अर्जदाराने भरलेल्या रकमेचा त्यात उल्लेख आहे.

वि.प.चे म्हणणे की, मार्च २००४ अखेर अर्जदाराने रु. ४०३०.५२ एवढी रक्कम भरली होती. तसेच त्यांना जून २००८ मध्ये सविस्तर हिशोब सांगण्यात आला व यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देण्यात आला आहे. वरील थकबाकीपैंकी ५०% रक्कम रु. २०१५.२६ ही त्यांना सवलत दिली व बाकी रक्कम पुढील हिशोबात धरण्यात आली आहे. या बाबतचा सर्व हिशोब अर्जदारास जून २००८ मध्ये समजावून सांगितलेला आहे व तो त्यांनी मान्य केला. त्या हिशोबा प्रमाणे जून २००८ अखेर अर्जदाराकडे रु. २७७१७.६८ एवढी बाकी निघते. सबब वि.प.चे म्हणणे की, अर्जदारास मे २००८ अखेर त्यांचेकडे असलेल्या रु. ७९१६/– या थकबाकीबाबत वसुलीची नोटीस देण्यात आली, ती योग्य व बरोबर आहे. या संबंधात दिलेला स्थगनादेश उठविण्यात यावा व अर्ज फेटाळण्यात यावा.

या प्रकरणामध्ये सुनावणीची तारीख नेमून अर्जदाराचे प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन यांचे सविस्तर म्हणणे ऐकले. तसेच वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता सर्वश्री. चव्हाण व पी.जी. जेधे व सहाय्यक लेखापाल यांनी आपले म्हणणे मांडले.

दोन्ही बाजूंचे म्हणणे व दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार करता, खालील प्रमाणे मुद्दे आमचे विचारार्थ उद्‌भवतात.

१) तक्रार अर्जदार यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळण्यास पात्र होता काय ?

उत्तर : होय

२) तक्रार अर्जदार यांना वि.प.ने यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ दिला आहे काय ?

उत्तर : होय

३) तक्रार अर्जदार यांचेकडे वि.प.ने मागितलेली थकबाकी वसुलीस पात्र आहे काय ?

उत्तर : होय

४) आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

**<u>कारणमिमांसा</u>**

प्रस्तुत प्रकरणातील सीपीएलच्या उताऱ्यामध्ये एप्रिल २००० मध्ये अर्जदाराकडे रु. १८७२.७४ एवढी बाकी होती. पुढे अर्जदाराने त्या बाकीपोटी कांही रकमेचा भरणा केला. वापरलेल्या विजेच्या बिलाची आकारणी त्याचे नांवे देण्यात आलेली आहे. मात्र सीपीएल मध्ये केलेली वीज बिलाची आकारणी ही एमईआरसीच्या दराप्रमाणे असलेने व अशा वीज वापरास महाराष्ट्र सरकारने यंत्रमागधारकांना सवलत दिली असलेने, वि.प. यांनी सवलतीच्या दराने आकारणी करुन ऑडीटेड स्टेटमेंटस् दाखल केली. सीपीएलमध्ये आकारलेली रक्कम सरकारी सवलतीच्या विरुध्द असलेने सीपीएलचा आधार न घेता ऑडीटेड स्टेटमेंट बाबत या प्रकरणी विचार करण्यात आला आहे. सीपीएल व ऑडीटेड स्टेटमेंटमध्ये ग्राहकाने भरलेल्या रकमांचा उल्लेख आहे. तसेच ग्राहकाने या प्रकरणामध्ये दि. २३.४.२००४, २५.११.२००४ व २०.८.२००८ रोजी भरलेल्या रकमांचा तपशिल दिलेला आहे व ती अर्जदार व वि.प.स मान्य असून ती रु. ७२१०/- एवढी आहे.

ऑडीटेड स्टेटमेंट मधील हिशोबांचा सन२००० पासून २००४ पर्यंत विचार करता, दि. ३१.३.२००४ अखेर अर्जदाराकडे रु. ४०३०.५२ एवढी थकबाकी होती. त्यामध्ये ५०% यंत्रमाग संजीवनी योजनेची सवलत रु. २०१५.१६ एवढी देवून उरलेली थकबाकी रु. २०१५.२६ ही ग्राहकाकडे येणे दर्शविलेले आहे व पुढे वाढलेली वीज बिलाची आकारणी करुन हिशोब केला आहे. त्या हिशोबाप्रमाणे ग्राहकाकडे ऑगस्ट २००४ पर्यंत रु. ५१८१.०६ एवढी रक्कम येणे होती व त्यावेळी ग्राहकाने ऑगस्ट२००४ अखेर रु. ५३००/- रकमेचा भरणा केलेला आहे.

सबब वरील हिशोबाप्रमाणे अर्जदार ग्राहक यंत्रमाग संजीवनी योजनेस पात्र होता व त्यास त्याचा लाभ देण्यात आलेला आहे. सबब वरील मुद्दा क्र. १ व २ कडे आमचे निष्कर्ष नोंदविले आहेत.

मुद्दा क्र. ३ बाबत विचार करणे झाल्यास, ऑगस्ट २००४ नंतर ग्राहकाने जरी कांही रक्कम भरली असली तरी त्यांचेकडे जून २००८ अखेर रु. २७७१७.६८ एवढी येणे बाकी आहे. तसेच नोटीसीप्रमाणे दि. २०.५.२००८ अखेर ग्राहकाकडे रु. ७९१६/% एवढी बाकी दिसून येत आहे आणि सदरची रक्कम ग्राहकाने वितरण कंपनीस देणे आवश्यक आहे. अशी रक्कम वसूल करणेस कायदेशीर प्रतिबंध दिसत नाही. सबब वि.प.स अशी रक्कम वसूल करण्याचा अधिकार प्राप्त होतो. परिणामी मुद्दा क्र. ३ कडे आमचा निष्कर्ष नोंदवित आहे.

या प्रकरणामध्ये ग्राहकाची तक्रार यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ दिला नाही ही योग्य व बरोबर नाही. वास्तविक त्यांना यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ दिला आहे व त्यांनाही वस्तुस्थिती जून २००८ मध्ये समक्ष समजावून सांगितलेली आहे. सबब प्रस्तुत अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते, सबब आदेश.

**<u>आदेश</u>**

१) अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

३) सदरची तक्रार अर्जदाराबाबत दिलेले दि. १५.७.२००८ व दिनांक ११.८.२००८ रोजीचे स्थगनादेश उठविण्यात येत आहेत.

४) वितरण कंपनीला तक्रार अर्जदाराकडे असणारी येणे बाकी नियमाप्रमाणे वसुलीची मुभा आहे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ११.११.२००८

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..